मनोहर अनंत पेडणेकर वि.

जयकुमार नरसिंगराव देसाई

## निशाणी क्रमांक ८६ वरील आदेश

१. प्रस्तुतच्या अर्जाद्वारे वादी यांनी मयत वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर यांचे वारसांना वादी म्हणून सामील करून घेणेची परवानगी मागितलेली आहे.

२. वादी यांच्या मते, सदर दाव्याचे कामकाज प्रलंबित असताना यातील वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर हे दिनांक ०५/१०/२०२३ रोजी मयत झाले आहेत. वादी क्र.२ यांना अनंत वसंत पेडणेकर (मूलगा) हा कायदेशीर वारस आहे. त्यामुळे त्यांना प्रस्तुत दाव्याकामी वादी म्हणून सामील करणेची परवानगी वादी यांनी प्रस्तुत अर्जाद्वारे केलेली आहे.

३. प्रतिवादी क्र. ११ ते १४ यांनी प्रस्तुत अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप घेतला आहे. त्यांचे असे कथन आहे की, प्रस्तुतचा अर्ज खोटा व खोडसाळ असून प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी अर्जात विलंबाबाबत नमूद करीत असलेले कारण संयुक्तीक नाही. प्रस्तुत अर्जावर वादी क्र.२ यांचे वारसांच्या सह्या दिसून येत नाहीत. वादीचा अर्ज कायदयाने चालणेस पात्र नसल्याने नामंजूर करणेची विनंती केलेली आहे. तसेच वादी यांनी न्यायालयाचा बहुमूल्य असा वेळ वाया घालविलेला आहे. त्यामुळे अर्ज मंजूर करावयाचा झालेस रक्कम रु.१०,०००/– इतका खर्च आकारणेची विनंती केलेली आहे.

४. अर्ज, म्हणणे व अभिलेखाचे अवलोकन केले. सदरचा दावा वादीने सरसनिरस धडेवाटप व ठरावाकरीता दाखल केलेला आहे. प्रस्तुत अर्जाच्या पुष्ठर्थ वादीने आपले प्रतिज्ञापत्र प्रस्तुत अर्जासोबत अभिलेखावर दाखल केलेले आहे. वादीने नि.८७ सोबत मयत वादी क्र.२ वसंत अनंत पेडणेकर यांच्या मृत्यूप्रमाणपत्राची प्रत अभिलेखावर दाखल केलेली आहे. दाव्याचा निकाल गुणदोषावर लागणेसाठी तसेच, नैसर्गिक न्याय तत्वाच्या आधारे मयत वादी क्र.२ वसंत

अनंत पेडणेकर यांचे वारस रेकॉर्डवर येणे गरजेचे आहे. त्यामुळे वादी यांचा सदरचा अर्ज मंजुर करणेस कोणतीच हरकत दिसून येत नाही. त्यामुळे मी खालील आदेश पारित करीत आहे.

**-:: आदेश ::-**

१. प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत येत आहे.

२. वादी यांना सरनाम्यामध्ये निशाणी क्र.८६ च्या अर्जाप्रमाणे दुरूस्त करणेची परवानगी देण्यात येते.

३. वादी यांनी सदर आदेशाप्रमाणे दाव्यात दुरूस्ती करणेची आहे व दाव्याची दुरूस्त प्रत पुढील तारेखस वा तत्पूर्वी प्रस्तुत दाव्यात दाखल करणेची आहे.

(आदेश खुल्या न्यायदालनात जाहीर.)

KUMBHAR RANJANA GOVIND

Digitally signed by KUMBHAR RANJANA GOVIND
Date: 2024.10.01 17:02:35 +0530

दिनांक- २६/०९/२०२४ (श्रीमती आर. जी. कुंभार)

ठिकाण- सावंतवाडी सह दिवाणी न्यायाधीश (क.स्तर), सावंतवाडी.